# इशारा

(स्वतंत्र सामाजिक कादंबरी)

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**इशारा : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# इशारा

# १

“होय महाराज, मला पुष्कळच सांगायचं आहे....”

कोर्टातल्या भाषणाचा प्रारंभ आपण असाच करू याबद्दल वासुदेवाला शंका नव्हती. त्यामुळे आपण जेव्हा खुनाच्या खटल्यातील आरोपी म्हणून कोर्टापुढे उभा राहू व “आरोपी, तुला काही सांगायचं आहे का !” असं जेव्हा कोर्ट आपल्याला विचारील तेव्हा आपण काय काय बोलू याचा विचार तो करू लागला की प्रत्येक वेळेस या एका वाक्याचा तो चटकन् उच्चार करून टाकीत असे व ते उच्चारून झाल्यावर पुढे काय बोलायचं ते मनाशी ठरवू लागत असे.

आजही हे वाक्य उच्चारल्यावर तो थांबला. एका भिंतीपासून दुसऱ्या भिंतीपर्यंत त्यानं फेरी घातली आणि मग जागच्या जागी उभं राहून, जणू कोर्टात आहोत अशी कल्पना करून तो पुढे बोलू लागला –

“... मला गुन्हा कबूल आहे. खून केल्यानंतर मी पळून गेलो नव्हतो. पोलिसांच्या स्वाधीन झालो होतो. गुन्हा नाकबूल करण्याची माझी इच्छा केव्हाच नव्हती. आताही नाही. जे कृत्य मी केले ते परिणामांची जाणीव ठेवूनच केलं. शिक्षा भोगायला मी तयार आहे. मी ही शिक्षा भोगली तर माझ्या हातून समाजाची मोठी सेवा घडेल अशी माझी श्रद्धा आहे. मी खून केला तो केवळ एका व्यक्तीचा प्राण घेण्याच्या हेतूनं नव्हे; समाजाला जागं करण्याच्या हेतूनं मी ते कृत्यं केलं. मला देहांत शिक्षा होईल हे मला माहीत आहे; परंतु मला त्याचा खेद होणार नाही. माझा प्राण जाईल; परंतु या खटल्याची आणि शिक्षेची हकीगत ऐकून समाजाचा प्राण परत

येईल. आंधळ्या समाजाचे डोळे उघडतील. माझी हकीगत कोर्टानं नीट लक्ष देऊन ऐकून घ्यावी अशी माझी विनंती आहे...''

वासुदेव पुन्हा थांबला. तो क्षणभर जागच्या जागी उभा राहिला आणि मग येरझारा घालू लागला. एकदा त्याची सावली समोरच्या भिंतीवर लांबच्या लांब पडलेली व त्याच्या एकेका पावलाबरोबर लहान लहान होत गेलेली त्याच्या नजरेला दिसे. एकदा ती त्याच्या पाठीमागे लहानाची मोठी होत असे. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता, वारा घोंघावत होता, खिडकीतून पाण्याचे तुषार आत येत होते, वाऱ्याच्या झोतानं खिडक्यांवरचे पडदे फुगत होते, एका भिंतीवर खिळ्याला टांगलेला आरसा किंचित डगडगत होता, टेबलावर काचेच्या दडपणाखाली ठेवलेले कागद फडफड वाजत होते... परंतु वासुदेवाला कल्पना करता येत होती की आपण कोर्टात आहोत! आरोपीच्या पिंजऱ्यात आपण उभे आहोत ! आपल्या हातात जाड जाड गारगार बेड्या आहेत. उंच व्यासपीठावर खुर्चीत न्यायाधीश बसले आहेत. ज्यूरीतले लोक आपल्याकडे बघत आहेत. कोर्टाच्या त्या काहीशा अंधाऱ्या जागेत लोकांची खूपच गर्दी झाली आहे व त्यांची आपसातील कुजबूज आपल्या कानी पडत आहे, त्या गर्दीत आपल्याला ओळखणारी कित्येक माणसं आहेत, ती एकमेकांना विचारीत आहेत, काय, या वासुदेवानं खून केला ? ज्याचा स्वभाव आनंदी आणि प्रेमळ, ज्याचा चेहरा नेहमी हसरा, ज्यानं द्वेष तर राहोच पण कुणाचा मत्सरदेखील केला नाही त्या या वासुदेवानं.....? आपले मित्र आपल्याकडे बघत आहेत. त्यांच्या नजरेतील विस्मय आणि सहानुभूती अगदी उघड दिसत आहे; परंतु त्यांची सहानुभूती आपल्याला नको आहे. ज्या समाजात आपले हे मित्र आणि इतर असंख्य माणसं आंधळेपणानं वावरत आहेत त्या समाजाला लागलेली एक घातुक कीड निपटून टाकण्यासाठी आपण खून केला तो काय लोकांनी सहानुभूती दाखवावी, दया करावी, आपल्या सुटकेसाठी प्रार्थना करावी म्हणून ? मित्रांच्या नजरेला उलट कृतज्ञतेची नजर देण्याचं काही कारण नाही... कोर्टातील ती कुजबूज चालूच आहे. अंधार वाढला म्हणून दिवे लागताहेत. पट्टेवाले इकडून तिकडे हिंडताहेत. अंगावरचे काळे झगे सरसावीत चालणाऱ्या वकिलांचे बुटांचे अस्पष्ट आवाज होत आहेत. टेबला-टेबलावरच्या कागदांच्या चवडी वर-खाली केल्या जात आहेत....



कोर्टातला हा देखावा वासुदेवाच्या नजरेपुढे उभा राहिला. गेले कित्येक दिवस तो देखावा त्याच्या दृष्टीस दिसला होता. ज्या ज्या वेळेस मनाशी ठरविलेल्या खुनाचा आणि पुढच्या परिणामांचा विचार तो करीत असे त्या त्या वेळेस त्याची कल्पना कोर्टातलं ते दृश्य त्याच्यापुढं उभं करी. ''आरोपी, तुला काही सांगायचं आहे काय?'' असं कोर्टानं विचारल्यावर तो म्हणणार होता, ''होय महाराज, मला पुष्कळ सांगायचं आहे.'' आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहून कोर्टाला आणि ज्यूरीला उद्देशून तो जे बोलणार होता ते खोलीत येरझारा घालता घालता तो पाठ केल्याप्रमाणे मनाशी म्हणे, ''.... माझी हकीगत कोर्टानं नीट लक्ष देऊन ऐकून घ्यावी अशी माझी विनंती आहे. मला जे सांगायचं आहे ते सारं मी लिहून काढलेलं आहे. नीलकंठचा खून करण्यापूर्वीच लिहून काढलेलं आहे. ते कोर्टाला वाचून दाखविण्याची मला परवानगी असावी...'' मग लिहून काढलेल्या साऱ्या गोष्टी तो वाचून दाखविणार होता.....

त्या लिहून काढल्या पाहिजेत असं त्यानं मनाशी पुष्कळ वेळा ठरविलं होतं; परंतु त्याच्या हातून लिहिणं घडलं नव्हतं. आज मात्र तो लिहिण्यास प्रारंभ करणार होता. कारण खुनाचा दिवस आता जवळ आला होता. अवघ्या दोन दिवसांवर. नीलकंठ परगावी गेलेला होता. ज्या दिवशी तो परत येणार होता त्या दिवशीच वासुदेव त्याला या जगातून नाहीसा करणार होता ! गोळी चालवून ! त्याच्या गुन्ह्याची त्याला जाणीव देऊन ! देवाचं नाव घ्यायला सांगून ! बिंबालाही अशीच जगातून नाहीशी करावी असं कित्येकदा त्याच्या मनात आलं होतं; परंतु त्याबद्दल त्याच्या मनाचा निश्चय झाला नव्हता. नीलकंठाचा प्राण घेण्याचं मात्र त्यानं पक्कं ठरविलं होतं. पापाच्या खातेऱ्यात लोळणाऱ्या आणि दुसऱ्यांना ओढणाऱ्या माणसांना शुद्धीवर आणण्याचा अखेरचा उपाय होता तो ! समाज आपलं कोणतंही पारिपत्य करू शकत नाही असं समजणाऱ्या माणसांना आणि अशा माणसांच्या वागण्याकडे डोळेझाक करणाऱ्या उदासीन समाजाला जागं करण्याचा तो एक मार्ग होता. नीलकंठाला मारायचं त्यानं ठरविलं होतं. आणखी दोन दिवसांनी. जे काही लिहावयाचं ते त्याच्या आत लिहून संपविलं पाहिजे...... वाऱ्याच्या झोतानं कॅलेंडरचा कागद फडफडत होता त्याकडे त्याची नजर गेली.... आता फक्त दोन दिवस उरले होते ! लिहिण्याच्या बाबतीत आता उशीर करून चालण्यासारखा नव्हता. आज प्रारंभ करायचाच असं वासुदेवानं ठरविलं होतं.....

सबंध दिवसभर पावसानं झोड उठविली होती. आता रात्रीही ती कमी झाली नव्हती. पावसाच्या जाड जाड सरींचा धो धो आवाज आणि वाऱ्याचा सळसळाट सारखा ऐकू येत होता. खिडक्यांचे पडदे फुगले की फटीतून रस्त्यावरच्या दिव्यांच्या प्रकाशात चमकणाऱ्या पाण्याच्या सरी दिसत होत्या. पावसाचा शिडकावा खोलीत शिरत होता.... वासुदेवाच्या मनात आलं, आता टेबलापाशी बसून लिहावयास प्रारंभ केलाच पाहिजे. परंतु टेबलाकडे जाण्याऐवजी तो खिडकीजवळ गेला. त्यानं पडदा पुरता सरकविला आणि पाण्याचे तुषार व वाऱ्याचा झोत अंगावर येत होता तरी तो खिडकीच्या कट्ट्यावर रेलून बाहेर बघू लागला. त्याच्या तोंडावर आणि अंगावर पाण्याचा आणि वाऱ्याचा फवारा सपकन लागला तो त्याला सुखाचा वाटला. तो आणखी वाकला आणि बाहेर पाहू लागला......

रात्र बरीच झाली होती. वृष्टी सुरू होती. परंतु माणसांचे व्यवहार चालूच; होते. समोरच्या इराण्याच्या हॉटेलात कपबशा वाजत होत्या. 'दो आना', 'छे आना' अशा आरोळ्या उठत होत्या. अर्धी भिजलेली, ओली झालेली माणसं आत शिरत होती. बसत होती. खात होती. मोठ्या आवाजात बोलत होती. विड्या फुंकीत होती. फूटपाथच्या फरशीवर पागोळ्या वाजत होत्या. जेमतेम कमरेखाली हातभर आलेलं धोतर, अंगात कुडतं आणि त्यावर जाड रंगीत चिटाचं जाकीट, डोक्याला दोन्ही कान झाकून टाकणारी विचित्र लाल बनातीची टोपी, अशा वेषातला किडकिडीत अंगाचा काळासावळा वसईकडला एक बागवान हिरव्या सालीच्या केळ्यांचे मोठे मोठे घड जिच्या दोन्ही टोकांना बांधलेले होते अशी काठी कावडीसारखी खांद्यावर घेऊन फूटपाथवरून पाणी चुकवीत घाईनं चालला होता. पलीकडे कोपऱ्यावर आता बंद असलेल्या एका फौंटनपेन रिपेअररच्या दुकानाच्या फळीवर एक गंडेऱ्या आणि शेंगा विकणारा बसला होता. त्याच्या पाटीतला डबडा दिवा धूर सोडीत होता. रस्त्यावरून एखादी मोटार वेगानं गेलं गेली की पाण्याचे फवारे उडत होते. आणि तिच्या दिव्यांच्या प्रकाशात रस्त्यावरची छोटी मोठी डबकी दिसत होती. रात्रीच्या अंधारात आणि उजेडात, पावसापाण्यात माणसं खातपीत होती, बोलत, बसत होती, धावत होती. माणसांचं जगणं चालू होतं.... जगण्याच्या क्रियेचं ते चमत्कारिक स्वरूप पाहता पाहता वासुदेवाला नीलकंठाची आठवण झाली.... त्याचं स्वत:चं जगणं तो आता संपविणार होता ! दोनच दिवसांनी ! ... तो सारं काही लिहून ठेवणार



होता... आज लिहायला आरंभ केलाच पाहिजे.... तो खिडकीतून दूर झाला. आपल्या टेबलापाशी गेला.

त्यानं काचेचं दडपण दूर करून त्याखालचे कागद हाती घेतले व जुळविल्यासारखे करून टेबलावर मांडले. दौत उघडली, फौंटनपेन भरून घेतलं. लिहिण्यासाठी म्हणून तो खाली वाकला.

परंतु लिहावयास प्रारंभ करण्याऐवजी फौंटनपेन हातात धरून त्याच्या टोकाकडे तो बघत राहिला...

त्याच्या डोक्यात विचारांची गर्दी झाली होती. गर्दीपेक्षाही गुंतागुंत अधिक झाली होती. कोणत्या विचारातून कोणता विचार निघत होता ते त्याला कळत नव्हतं. मनातल्या साऱ्या गोष्टी लिहावयाच्या तर कोणती गोष्ट आधी लिहिली पाहिजे व कोणती मग ते त्याला ठरविता येत नव्हतं. जी एकंदर हकीगत लिहायची ती अनेक वर्षांची होती, लांबलचक होती, तिच्यात अनेक लहान-मोठ्या घटना होत्या हे तर झालंच; पण त्यातली कोणती घटना आधी सांगावी ते ठरवणं कठीण होतं. वासुदेव सराईत लेखक नव्हता. जी हकीगत लिहून काढायची तिचा प्रारंभ कुठे करावा ते त्याला कळत नव्हतं. जे जे घडलं होतं ते सारं त्याच्या मनापुढे होतं, त्याला स्पष्ट आठवत होतं. असंख्य वेळा त्या सगळ्या गोष्टींची उजळणी त्यानं आपल्या मनाशी केली होती. त्यामुळेच नीलकंठाचा खून करण्याचा त्याचा विचार दृढ होत गेला होता. परंतु पुन्हा पुन्हा आठवल्यामुळेच की काय अनेक वर्षांतल्या अनेक घटनांचा आता एक प्रकारचा संकलित सारांश त्याच्या मनात तयार झाला होता. एखाद्या द्रव पदार्थाचा आटून आटून अर्क उरावा, तसं त्या आठवणीचं झालं होतं. त्या जेव्हा वासुदेवाच्या मनात येत, तेव्हा क्षणार्धात एकदम सगळ्या येत व आल्या की तो मनाशी म्हणे, मला हे कृत्य केलंच पाहिजे. एकेक घटना क्रमाक्रमानं आठवावी असं प्रथम काही दिवस त्यानं केलं होतं; परंतु आता त्याला तसं करता येत नसे. त्या साऱ्या आठवणी एकमेकीत मिसळून गुंतून गेल्या होत्या आणि त्यांचा एकच एक लहानसा पुंजका तयार झाला होता. एकेका आठवणीचा निराळेपणा असा काही राहिला नव्हता.... त्यामुळे आता जेव्हा वासुदेव लिहावयास बसला तेव्हा त्याला एक घटना दुसरीपासून वेगळी करून पाहताच येईना. कोणती गोष्ट प्रथम कागदावर लिहावी ते त्याला कळेना....

नीलकंठाचा प्राण घेण्याचं आपण का ठरविलं ते विस्तारानं लिहिण्याची त्याची इच्छा होती.... का ठरविलं ? ... या क्षणाला त्याला एवढंच समजत होतं की यापुढे स्वस्थ बसणं त्याला अशक्य झालं होतं म्हणून तो नीलकंठाला ठार करणार होता. उघड्या डोळ्यांनी गोष्टी पाहणं आता शक्य नव्हतं म्हणून. बिंबाला उपदेश करून करून तो थकला होता. नीलकंठाला त्यानं समजुतीच्या गोष्टी सांगितल्या होत्या, धमकी दिली होती. बिंबाचा नवरा डॉक्टर भूषण तर काय, तो देवाचा अवतारच होता की काय कुणास ठाऊक ? त्याला कसला संताप येतच नव्हता, चीड वाटतच नव्हती, त्याचं क्षमाशीलत्व ढळत नव्हतं, आपली लाडकी बायको बिंबा दुराचारांच्या मार्गानं कितीही दूर गेली असली तरी ती सद्वर्तनाच्या वाटेकडे परत येईल याबद्दलची त्याची वेडी आशा चिवट होती. वासुदेवाला पुष्कळदा वाटलं होतं, नवरा प्रेमळ, सालस, गरीब मिळाला म्हणून बिंबा अधिकाधिक बिघडत गेली. तिचा पहिला दुराचार कळल्याबरोबर भूषणनं तिच्या मुस्काटात मारली असती तर ती कशाला बहकली असती ? वासुदेवाच्या मनात येई. बिंबाचा एकपट गुन्हा तर तिला बिघडविणाऱ्या नीलकंठाचा दसपट गुन्हा आणि तिला धाक न दाखविणाऱ्या भूषणचा शतपट गुन्हा. भूषणसारखे नवरे असू तरी कसे शकतात याचं वासुदेवाला मोठं नवल वाटे. तो भूषणला म्हणे, ''ज्याला तू प्रेमळपणा म्हणतोस तो प्रेमळपणा नाही, शुद्ध गाढवपणा आहे. तुझा शांतपणा म्हणजे निव्वळ भेकडपणा आहे. तुला संताप कसा येत नाही ? बिंबाला तू चाबकाखाली फोडून कशी काढीत नाहीस ?'' भूषण त्याला म्हणे, ''हाणामारीनं किंवा अत्याचारानं माणसाचं मन पालटत नसतं.'' तो विचारी, ''मग पापी मनुष्य कशानं सुधारतं ?'' भूषणचं ठराविक उत्तर होतं, ''क्षमेनं. शांतीनं. प्रेमानं !'' भूषणची ती विचारसरणी वासुदेवाला हास्यास्पद वाटत होती. भूषणच्या क्षमाशीलतेचा त्याला वीट आला होता, संताप आला होता. बिंबाची लहान सोन्यासारखी मुलगी कुसुम ! तिच्याकडे पाहिलं की भूषणचा वेडेपणा, बिंबाचा वाह्यातपणा, नीलकंठाचा दुष्टपणा सहस्रपटींनी वाढल्यासारखा वासुदेवाला दिसू लागे. समाजात वाढणाऱ्या दुराचाराच्या प्रवृतीचं चित्र एकदम खूप मोठं आकार घेऊन डोळ्यांपुढे उभं राहिल्यासारखं त्याला वाटे. बोलूनचालून कुसुम म्हणजे एक लहान बालिका होती. बिंबाच्या दुर्वर्तनाचा तिला काय बोध होणार ? ती आपली आई आहे एवढंच तिला कळत असे. मात्र आपली आई इतर आयांसारखी नाही,



तिचा आपल्यावर जीव नाही हे तिनं जणू बालकांच्या उपजत बुद्धीनं ओळखलं होतं. ''तुला आई आवडते का ?'' असं तिला विचारलं की ती भुवया दुमडून, मान हलवून म्हणे, ''अं हं ! मला नाही आवडत आई !'' ''का ?'' असा प्रश्न केला की ती आणखीच नाराज चेहरा करून उत्तर देई, ''ती फार वाईट आहे !'' त्या बालिकेचं ते बोलणं ऐकलं की वासुदेवाच्या मनात येई, कुणीच कसं जागं होत नाही ? त्याला किळस येई. संताप येई...

त्यानं पुष्कळ दिवस सारं पाह्यल होतं. सहन केलं होतं. वाट पाहिली होती. आता वाट पाहणं त्याला अशक्य झालं होतं. काहीतरी केलंच पाहिजे आणि ते आपणच केलं पाहिजे असं त्यानं ठरविलं होतं.

आता या क्षणाला त्याला एवढंच लिहिण्याचं सुचत होतं, ''काहीतरी केलंच पाहिजे- आणि ते आपणच केलं पाहिजे असं मला वाटलं म्हणून...'' एवढाच साऱ्या हकीगतीचा सारांश होता आणि तेवढाच त्याला सुचत होता.

परंतु कोर्टाला जी लेखी हकीगत सादर करायची ती एवढीच असून कसं भागेल ? कोर्टाला आणि जगाला सारं सारं कळावं अशी त्याची इच्छा होती. बिंबा, भूषण, नीलकंठ यांच्या स्वभावचित्रातल्या एकूण एक छटा लोकांना स्पष्ट दिसाव्यात, बिंबाच्या अध:पाताचा दोष समाजाकडे देखील कसा आणि किती होता हे उघड व्हावं या हेतूनं त्याला साऱ्या गोष्टी सांगायच्या होत्या. बिंबाविषयी त्याच्या स्वत:च्या मनात कोणत्या भावना होत्या, ती त्याला किती प्रिय होती आणि प्रिय असल्यामुळेच तिचं स्वैर वर्तन त्याला किती असह्य झालं होतं, तिला त्यानं कितीदा उपदेश केला होता, नीलकंठाचा सहवास तुटावा यासाठी किती प्रयत्न केले होते, तिची कितीदा मनधरणी केली होती, कितीदा निर्भर्त्सना केली होती, याच्यादेखील हकीगती त्याला सांगायच्या होत्या.... हे सारं सांगायचं म्हणजे अगदी प्रारंभापासून सुसंगतपणे सांगायला हवं होतं; परंतु गेल्या कित्येक वर्षांतल्या ज्या घटनांचा शेवट तो करणार होता - नीलकंठाचा प्राण घेऊन करणार होता ! - त्यांतली पहिली कोणती म्हणावी ते त्याला चटकन समजत नव्हतं. वाकडं तिकडं गुंडाळलेलं सुताचं बंडल उलगडण्यासाठी हाती धरावं आणि सुताचं टोकच सापडू नये तसं त्याचं झालं होतं. एकंदर हकीगतीचं पहिलं टोक त्याला सापडत नव्हतं.... फौंटनपेनच्या टोकाकडे बघत तो किती वेळतरी स्वस्थ राहिला....